# सेरेब्रल पाल्सीग्रस्त मुलांसाठी विशेष मार्गदर्शन

## रितू छाब्रिया यांची घोषणा, मुकुल माधव फौंडेशनने घेतला पुढाकार




सातारा : व्हीलचेअरचे वाटप करताना खासदार उदयनराजे भोसले, दमयंतीराजे भोसले, जिल्हाधिकारी अश्विन मुद्गल, शाम देशपांडे व इतर.

प्रतिनिधी
सातारा

सेरेब्रल पाल्सीग्रस्त मुलांना सर्वंकष आधार पुरविण्याच्या उद्देशाने मुकुल माधव फाउंडेशन साताऱ्यातील रुबी हॉल हेल्थ केअर सर्व्हिसेस येथे विशेष सल्लाकेंद्र उघडणार आहे. येथे या मुलांना दूर-पुनर्वसन कार्यक्रमाचे लाभ घेता येतील तसेच केईएम रुग्णालय, पुणे येथील तज्ज्ञांचे मार्गदर्शन व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे मिळविता येईल. बालमेंदू तज्ज्ञ आणि मानसशास्त्रज्ञांसारख्या तज्ज्ञांची उणीव पूर्ण करण्यास यामुळे मदत होईल, अशी घोषणा मुकुल माधव फाऊंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू छाब्रिया यांनी केली.

ही जागा मोफत उपलब्ध करून देणारे रुबी हॉलचे डॉ. परवेज ग्रँट आणि या उपक्रमात सहकार्य करणारे डॉ. भारती पाटील यांनी प्रतिनिधित्व केलेल्या केईएम रुग्णालयाचे डॉ. आनंद पंडित यांचे एमएमएफ आभार मानू इच्छिते.

सेरेब्रल पाल्सीग्रस्त मुलांना सेरेब्रल पाल्सी खुर्च्या, व्हीलचेअर आणि कमोड चेयरच्या वितरणप्रसंगी साताऱ्यात आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या.

जिल्हाधिकारी अश्विन मुदगल, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नितीन पाटील, पुणे विभागाचे अतिरिक्त आयुक्त शाम देशपांडे, जिल्हा आरोग्य अधिकारी दिलीप माने, जिल्हा शिक्षण अधिकारी पुनिता गुरव, कूपर कॉर्पोरेशन प्रा. लि. चे व्यवस्थापकीय संचालक फारोख कूपर आणि कूपर कॉर्पोरेशन प्रा. लि. चे सीईओ जाल कूपर, रुबी हॉल क्लिनीकचे डॉ. परवेज ग्रँट आणि केईएम इस्पितळाच्या भारती पाटील यावेळी उपस्थित होत्या.

खासदार उदयनराजे भोसले आणि त्यांच्या पत्नी दमयंतीराजे भोसले यांची उपस्थिती हे या सोहळ्याचे आणखी एक आकर्षण ठरले. या खुर्च्या फिनोलेक्स इंडस्ट्रीज लि. ची सीएसआर शाखा असलेल्या मुकुल माधव फाऊंडेशनच्यावतीने भेट देण्यात आल्या.

या कार्यक्रमात एकूण पाच व्हिलचेयर्स, पाच कमोड व्हिलचेयर्स आणि एक सेरेब्रल पाल्सी खुर्ची देण्यात आली. मुकुल माधव फाऊंडेशनने सातारा जिल्ह्यातील सेरेब्रल पाल्सीग्रस्त मुलांना आतापर्यंत ७४ व्हिलचेयर्स आणि ५२ कमोड खुर्च्या भेट दिल्या आहेत. आणखी ३६ खुर्च्या येत्या सोमवारी जिल्ह्यातील विविध शाळांना भेट देण्यात येणार आहेत.

मुकुल माधव फाऊंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू छाब्रिया म्हणाल्या, या मुलांना तसेच त्यांच्या मातांना पुण्यातील तज्ज्ञांकडून मार्गदर्शन व समुपदेशन केले जाणार आहे. यामुळे परिणामकारक उपचार होण्यास मदत होणार आहे.

गरजू मुलांपर्यंत या सुविधा पोचाव्यात, यासाठी दुर्गम भागातील मुलांना या केंद्रापर्यंत येण्यासाठी वाहतुकीच्या सोई पुरविण्याचे आवाहन त्यांनी जिल्हा प्रशासनाला केले.

दमयंतीराजे भोसले म्हणाल्या, रितू छाब्रिया केवळ परोपकाराच्या भावनेने हे उदात्त कार्य करत आहेत. मुकुल माधव फाऊंडेशन करत असलेले काम कौतुकास्पद असून प्रत्येकाने त्याला दाद द्यायला हवी.